## नियमीत दिवाणी दावा क. 53/2011 मधील अर्ज (निशाणी क. 64) वर आदेश

सदर अर्जामध्ये वादी याने असे नमुद केले आहे की, दाव्यातील वादी दावा दाखल करतेवेळी अज्ञान होता. तो आता सज्ञान झालेला असुन नाशिक येथे समाज कल्याण, आडगाव, नाशिक येथे बी. ई. इंजिनिअर शाखेत शिक्षण घेत आहे. तो आता सज्ञान झाल्याने त्यास सदर दावा चालविण्याची परवानगी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

2. प्रतिवादींनी योग्य ते आदेश होणेची विनंती केलेली आहे.

3. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. वादी याने त्याचे जन्माचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यावरुन असे दिसुन येते की, वादीचा जन्म हा दि. 06/11/2000 रोजी झाला. त्यामुळे आजरोजी वादी हा सज्ञान आहे. अशा परिस्थितीत वादीस सज्ञान झाल्याने दावा चालविण्याची परवानगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

### आदेश

1. अर्ज मंजुर करण्यात येतो.
2. वादी संज्योत रत्नाकर भालेराव यास सज्ञान झाल्याने दावा चालविता येईल.

सही/–

दिनांक :–23/01/2025

(यशश्री मारुलकर)
दिवाणी न्यायाधिश, व. स्तर,
इगतपुरी